Vol 6 Issue 1 October 2016

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# “अकोला आणि वाशिम जिल्हयातील महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या योजनांचे चिकित्सक अध्ययन”

प्रा. अनिल महादेवराव तिरकर[1] , प्रा. डॉ. अरुंधती एस. निनावे[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महा. अकोला.
[2]सहयोगी प्राध्यापक , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महा. अकोला.



**सारांश :**
मनुष्य हा सृजनशील प्राणी आहे. सृजनशीलता म्हणजे बौध्दिक व श्रमिक कष्ट घेण्यासाठी सक्षम असलेल्या व्यक्तीव्दारे तो करीत असलेल्या कार्यात आणखी नविन करण्याची इच्छा ठेवणे होय आणि याच इच्छापूर्तीला विकास अवस्थेत आणण्याकरिता प्रत्येक व्यक्ती प्रयत्नशील असतो. प्रत्येक व्यक्ती ही त्याच्या बौध्दिक संपन्नेतून काही उद्यमित गुण व कौशल्ये प्राप्त करुन घेतो व त्याला श्रमाची जोड देत असतो. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून जेव्हा प्रत्येक व्यक्ती ही उद्योग, व्यवसाय करु लागतो किंवा नव्याने व्यवसाय सुरु करु इच्छित असतो. तेव्हा त्याने सुरु करावयाच्या उद्योग किंवा व्यवसायाला सामाजिक घटक, आर्थिक घटक व राजकीय घटक हे प्रभावित करीत असतात. ष्महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळष हे मागासवर्गीय समाजातील बेरोजगारांना आधुनिक आणि पारंपारिक अशा दोन्ही व्यवसायासाठी वित पुरवठा करुन त्यांच्या स्वयंरोजगाराला चालना देऊन, त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे यावर भर देतात.

**किवर्ड :** महामंडळाची स्थापना, निर्मीती हेतू, भांडवल उभारणी, महामंडळाच्या विविध योजना, स्वयंरोजगार.

**प्रस्तावना:**
महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील दारिद्र्य रेषेखालील सर्वच लोकांना मूलभूत सोयी स्वरुपात शैक्षणिक व आर्थिक सवलती दिल्या आहेत व त्याची अंमलबजावणी विविध विभागामार्फत केली जात आहे. परंतु सर्व समाजातील प्रत्येक व्यक्ती स्तरावर शैक्षणिक, आर्थिक सवलती पुरविणे विभागीय यंत्रणेला शक्य होत नाही. पर्यायाने राज्यतील जात प्रवर्ग निहाय अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग व अल्पसंख्यांक इत्यादी घटकांना त्यांचा स्वतंत्रपणे सर्वांगीण विकास होण्याकडे जातीने लक्ष घालता यावे या उदात्त हेतून सामाजिक न्याय विभागाअंतर्गत महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. अकोला व वाशिम जिल्ह्यातील इतर मागासवर्गीयांना सुध्दा महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाव्दारे २००२ पासून विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्याला उद्योग, व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज स्वरुपात वित पुरवठा केला जात आहे. इतर मागास प्रवर्गातील समाविष्ट जाती वर्गामधील महिला, सुशिक्षीत बेरोजगार व्यक्ती, व्यक्तीचे बचत गट, शिक्षण घेणारे विद्यार्थी, व्यवसाय प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी, दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न कमविणारे व्यक्ती अशा सर्वच व्यक्ती स्तरावरुन महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या ०७ योजनांव्दारे उद्योग तसेच व्यवसायाला कर्ज स्वरुपात वित पुरवठा महामंडळाव्दारे केला जातो. महामंडळाने ठरवून दिलेल्या विविध कर्ज योजनांच्या निकषांची पूर्ती करणारे त्या योजनेच्या पात्र लाभार्थींना कर्ज स्वरुपात वित्तीय पुरवठा करण्यात येतो.

**महामंडळाची स्थापना:**
घटनेच्या कलम ३७१ नुसार विदर्भाच्या विकासाच्या दृष्टिने विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. याच कलमा अंतर्गत राज्यातील संपूर्ण ओबीसी नागरिक, बेरोजगार विद्यार्थी यांच्या विकासाच्या दृष्टिने व्यक्ती, कुटुंब व समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वयंःरोजगाराला चालना देण्याच्या उद्देशाने शासनाने सामाजिक न्याय विभागा अंतर्गत इतर मागास वर्गीयांसाठी “महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ लि.” ची स्थापना केली. कंपनी कायद्याखाली या महामंडळाची दि. २३ एप्रिल १९९९ रोजी सरकारी

कंपनी म्हणून नोंदणी करण्यात आली.

*निर्मीती हेतू :*

अ) जिल्हा, तालुका व गावपातळीवर महामंडळाव्दारे राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती पोहोचविणे.
ब) इतर मागासवर्गीयांचे सर्वांगीण कल्याण व विकास साधण्यासाठी पुरवठा करणे.
क) स्वयंरोजगाराला चालना देऊन इतर मागासवर्गीयांची आर्थिक स्थिती उंचावणे.
ड) महामंडळाकडून कर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना व्यवसाय व उद्योग यशस्वीपणे चालविता यावा म्हणून लाभार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
इ) इतर मागासवर्गीय लाभार्थीच्या उद्योग व्यवसायातील उत्पादन निर्मितीला, बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.

*भांडवल उभारणी :*

महामंडळाच्या वित्तीय बाजूचे महत्त्व लक्षात घेवून महामंडळांची स्थापना करतानाच महामंडळाचा भावी प्रवास सुकर व्हावा, आर्थिक प्रश्न व अडचणी निर्माण होवू नयेत आणि निर्माण झाल्यास त्याचे सहज निराकरण करता यावे याकरिता महामंडळाने एक वित्तीय योजना ;थ्पदंदबपंस च्संदद्ध तयार केली. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. ५० कोटी असुन, राष्ट्रीय महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी शासनाने रु. १२५ कोटींची हमी मंजूर केली आहे. महामंडळाच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवर राबविल्या जातात. उपलब्ध मनुष्यबळ व निधी लक्षात घेऊन आजपर्यंत जास्तीत-जास्त लोकांपर्यंत योजना पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

*महामंडळाच्या योजना:*

*1.बीज भांडवल योजना:*

उद्योग व सेवा क्षेत्रातील व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या किंवा स्वयंःरोजगाराची संधी निर्माण करणाऱ्यांची आकांशा बाळगणाऱ्या उद्योजकाला 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाकडून' कर्ज मिळण्यासाठी प्रकल्प अहवाल सादर करावे लागतात. प्रकल्पाचा जो संकल्पित खर्च असतो त्याच्या किमान ०५% खर्च रक्क्म ही लाभार्थ्यांनी स्वतःच्या संसाधनामधून उभी करावी अशी अपेक्षा असते. उर्वरित रक्कमेच्या २०% रक्कम 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ' तर ७५% एवढी रक्कम विविध राष्ट्रीयकृत बॅकांव्दारे कर्ज स्वरुपात वित्त पुरवठा केला जातो. प्रस्तावित केलेल्या प्रकल्पाचा खर्च किंवा कर्ज मर्यादा ही जास्तीत-जास्त रु. ०५.०० लाख एवढी राहील. तसेच प्रकल्प खर्च हा रु. ०५.०० लाख पेक्षा जास्त असेल अशा परिस्थीतीत सुध्दा कर्ज मंजुरीची रक्कम रु. ०५.०० लाख एवढीच राहील. बीज भांडवल योजनेच्या अंतर्गत सुशिक्षीत बेकारांना मंजुर करण्यात येण्याऱ्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी हा ०६ वर्षाचा असून व्याजाचा दर हा ०६% एवढा असतो.

*2.मर्जिन मनी योजना :*

मार्जिन मनी योजने अंतर्गत लाभार्थ्याने दिल्या जाणाऱ्या कर्ज रकमेपैकी अर्ध्यापेक्षा अधिक रकमेतून यंत्रसामग्री खरेदी करणे तसेच जमीन किंवा जागा खरेदी करणे जेणे करुन आर्थिक मालमत्ता निर्माण होईल या उद्देशाने कर्जाचे वितरण करते. या योजने अंतर्गत कर्ज वितरणाच्या राशी पैकी बॅकेचा सहभाग ५०%, राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ४०%, राज्य महामंडळाचा सहभाग ०५% व लाभार्थ्याचा सहभाग ०५% असतो. मार्जिन मनी योजने अंतर्गत लाभार्थ्याला मिळालेल्या कर्ज रकमेपैकी काही रक्कम खेळते भांडवल व काही रकमेतून मालमत्ता खरेदी करावी लागते. या योजने अंतर्गत महत्तम कर्ज मर्यादा रु. ०५.०० लाख एवढी आहे. त्यातून रु. ०३.०० लाखाची मालमत्ता निर्माण होईल या उद्‌देशाने कर्जाचे वितरण केले जाते. महामंडळाच्या कर्जावर ०६% दराने व बॅकेच्या व्याजानुसार बॅक सहभाग राशी वर व्याजाची आकारणी केली जाते. या योजनेचा कर्ज परत फेडीचा कालावधी हा ०५ वर्ष एवढा असतो.

*3. स्वर्णिमा योजना:*

इतर मागास प्रवर्गातील ज्या महिला दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न गटात समाविष्ट होतात त्यांना सुध्दा अर्थसहाय्य पुरवल्यिा जावे, जेणे करुन त्या एखाद्‌या उद्योग व्यवसायाला चालना देवून, समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यास हातभार लागेल. या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाव्दारे' स्वर्णिमा योजने अंतर्गत कर्जाचे वितरण करण्यात येत आहे. दारिद्र्य रेषेखालील महिलांना प्रकल्प खर्चाच्या रु. ५०,००० पर्यंत कर्जाचे वितरण करण्यात येते. या योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या राशी मध्ये राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग ९५ः तर राज्य महामंडळाचा सहभाग ०५% एवढा असतो. या योजने अंतर्गत महिलांना सहभाग भरावा लागत नाही. सदर कर्ज योजनेचा परतफेडीचा कालावधी हा ०७ वर्षे एवढा असतो तर कर्जाच्या राशी वर ०४% दराने व्याजाची आकारणी केली जाते.

*4.स्वयं सक्षम कर्ज योजना:*

इतर मागासवर्गीय जाती घटकामधील व्यावसायिक शिक्षण पूर्ण केलेल्या १८ ते ३५ वयोगटातील तरुण/तरुणींसाठी व्यवसाय किंवा उद्योग सुरु करण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाव्दारे' स्वयं सक्षम कर्ज योजने अंतर्गत कर्ज वितरण करण्यात येते. व्यावसायिक शिक्षण पूर्ण झालेल्या इतर मागासवर्गीय घटकातील व्यक्तीला ज्या व्यवसाय किंवा उद्योगाच्या माध्यमातून स्वयंरोजगार सुरु करावयाचा आहे. त्याचा प्रकल्प अहवाल तयार करुन महामंडळाच्या स्थानिक कार्यालयात सादर करावा लागतो. स्वयं सक्षम कर्ज योजनेमध्ये राष्ट्रीय महामंडळाचा ९०%, लाभार्थीचा ०५ः व राज्य महामंडळाचा ०५% एवढा सहभाग लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्ज राशी मध्ये समाविष्ट असतो. स्वयं सक्षम कर्ज योजने अंतर्गत लाभार्थ्याला प्रकल्प अहवालाच्या खर्चानुसार जास्तीत-जास्त रु. ०५.०० लाखापर्यंत कर्जाचे वितरण करण्यात येते. मिळालेल्या कर्ज राशीवर ०५% दराने व्याजाची आकारणी केली जाते तसेच लाभार्थ्यास कर्जाची परतफेड करण्यासाठी ०५ वर्षाचा कालावधी दिल्या जातो.

### 5. मुदती कर्ज योजना :

इतर मागासवर्गीय जाती घटकातील लोकांना आपल्या वडिलोपार्जित परंपरागत व्यवसायाला वृध्दिंगत करण्यासाठी तसेच नव्याने व्यवसाय करण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ' मुदती कर्ज योजने अंतर्गत लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण करते. लाभार्थ्यांव्दारे कर्जाचे अहवाल महामंडळाकडे सादर केल्या जाते. प्रस्तावित प्रकल्पाच्या ०५% सहभाग हा लाभार्थ्याचा असतो. उर्वरित रकमेचा ८५% सहभाग 'राष्ट्रीय इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ' तर १०% रकमेचा वाटा 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाव्दारे' दिल्या जातो. मुदती कर्ज योजने अंतर्गत महामंडळाकडे प्रस्तावित केलेल्या प्रकल्पाचा खर्च किंवा कर्ज मर्यादा ही जास्तीत-जास्त रु. ०३.०० लाख एवढीच राहिल. मंजूर करण्यात येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी हा ०५ वर्ष एवढा राहतो. या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या कर्ज रकमेवर ०६% दराने व्याजाची आकारणी केली जाते.

### 6. सूक्ष्म पतपुरवठा योजना :

नोंदणीकृत अशासकीय संस्था, विश्वस्त मंडळे, विना अनुदानित संस्था अशा इतर मागासवर्गीय जाती घटकामधील पुरुषांच्या बचत गटांना इतर मागासवर्गीयांचा सामूहिक विकास करण्याच्या हेतूने 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाव्दारे' सूक्ष्म पतपुरवठा योजने अंतर्गत कर्जाचे वितरण करण्यात येते. या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या कर्ज रकमेतील राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग हा ६०% राज्य महामंडळाचा ०५% आणि लाभार्थी समूह गटाचा ०५% एवढा सहभाग असतो. या योजने अंतर्गत कर्ज मर्यादा ही रु. ०५.०० लाख एवढी आहे. प्रत्येक समूह गटात जास्तीत-जास्त २० व्यक्ती सहभाग घेऊ शकतात. स्वयंसेवी संस्था प्रत्येक सदस्यांना जास्तीत-जास्त रु. २५००० इतके विविध उपक्रमाकरिता कर्ज वितरण करु शकते. सूक्ष्म पतपुरवठा योजने अंतर्गत वितरीत कर्ज रकमेवर ०५% दराने व्याजाची आकारणी केली जाते. तसेच हे कर्ज परतफेडीचा कालावधी हा ०४ वर्ष एवढा असतो.

### 7. महिला समृध्दी योजना :

शहरी व ग्रामीण भागातील इतर मागासवर्गीय जाती घटकामधील महिला स्वयं:सहाय्यता बचत गटांना थेट कर्ज पुरवठा महिला समृध्दी योजनेच्या माध्यमातून महामंडळाव्दारे केल्या जात आहे. महिला समृध्द योजने अंतर्गत एका बचत गटातील कमीत-कमी २० महिलांना प्रत्येकी जास्तीत-जास्त रु. २५,००० याप्रमाणे स्वयं:सहाय्यता बचत गटाच्या लाभार्थ्याला कर्जाचे वितरण केले जाते. स्वयं:सहाय्यता बचत गटाला प्रकल्प मर्यादेच्या रु. ०५.०० लाख इतके कर्ज वितरित केले जाते. एकुण कर्ज रकमेतील राष्ट्रीय महामंडळाचा ६०% सहभाग, राज्य महामंडळाचा ०५ः सहभाग तर बचत गटातील सभासदांचा ०५% एवढा सहभाग असतो. ०४% दराने सदर कर्ज रकमेवर व्याजाची आकारणी केली जाते व ०४ वर्ष कर्ज परतफेडीचा कालावधी हा ठरवून दिलेला असतो.

### साहित्याचे पुनरावलोकन :

#### 1. Nomita Yadav (2002)

लेखकाने कष्ट करणाऱ्या वर्गाला मागास संबोधले आहे. तसेच उत्पादन व वितरण हे जाती व्यवस्थेवर आधारित आहे. ज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचा समावेश करण्यात आला. ज्याची संख्या भारत देशात १/३ इतकी होती. या तिन्ही जाती मध्ये इतर मागासवर्गीयांची संख्या जास्त होती. तसेच त्यात इतर उपजाती सुध्दा होत्या.

#### २. Manoranjan Mohanty (2004)

लेखकाने विसाव्या शतकाच्या परिस्थीतीचा आढावा घेतला आहे. ग्रामीण बिहारमधील परिस्थीतीचा अभ्यास केला. १९७० च्या यादव समाजातील जे इतर मागासवर्गीयांमध्ये मोडतात त्यांचा दाखला देतांना लेखकाने असे म्हटले आहे की, जातीच्या आधारावर हे लोक राजकारणामध्ये आहे. तरी पण त्यांना विशेष मदतीची आवश्यकता आहे.

#### ३.Puneya Ajitkumar (2005)

यांच्या प्रकल्प अहवालामध्ये राष्ट्रीय मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळाव्दारे गरीब मागासलेल्या लोकांच्या आर्थिक विकासाकरिता वित पुरवठ्या बरोबरच त्यांना तांत्रिक कौशल्य आणि व्यावसायिक माहिती तसेच तयार मालाकरिता विपणन सुविधा देऊन, स्वयंरोजगारा करिता सक्षम करावे असे निष्कर्ष काढले आहे.

#### 4. बोरचाटे सुनिल शिवदास (2011)

यांनी वाशिम जिल्हयाचा योजनानिहाय व तालुकानिहाय अभ्यास केला आहे.

#### ५. Krishan Kewal (2012)

संशोधकाने महामंडळाव्दारे कर्ज घेतलेल्या लाभार्थीची संख्या, वेगवेगळ्या कर्ज योजनांची कल्पना, मिळालल्या कर्ज रकमेवर समाधान, कर्ज घेण्यास लागणारा वेळ आणि इतर मागासवर्गीय यांचा आर्थिक विकास या विषयावर प्रकाश टाकला.

### संशोधनाची उद्दिष्टे :

१.अकोला आणि वाशिम जिल्हयातील महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांचे योजनानिहाय वैयक्तिक, व्यवसायिक व आर्थिक वारंवारितेचे अध्ययन करणे.

२.महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या विविध योजने अंतर्गत लाभार्थ्यांचे वैयक्तिक व व्यावसायिक सहसंबधाचे अध्ययन करणे.

### संशोधन पध्दती :

संशोधकाने संशोधनासाठी 'वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा' उपयोग केला आहे. प्राथमिक तथ्ये गोळा करण्यासाठी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावलीचा उपयोग केला गेला. व्दितीयक सामुग्री गोळा करण्यासाठी सार्वजनिक प्रलेख, ग्रंथ, वर्तमानपत्रे, पत्रिका, साप्ताहिके व वेबसाईट यांचा उपयोग केला गेला.

'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने' २००५-०६ ते २०१०-११ या कालखंडात अकोला आणि वाशिम जिल्हयात विविध योजनांच्या माध्यमाने एकूण २४६६ लाभार्थ्यांना कर्ज पुरवठा केला होता. संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने नमुना निवड करतांना 'गैरसंभाव्यता नमुना निवड' पध्दतीचा उपयोग करुन 'सोयीस्कर नमुना' निवडून एकूण लाभार्थ्याच्या ५०० (२०%) लाभार्थी आपल्या अध्ययनासाठी निवडले.

### महितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

संशोधनासाठी संकलित करण्यात आलेल्या माहितीचे योजना निहाय वैयक्तिक, व्यावसायिक व आर्थिक विषयक निर्देशांक काढण्यात आलेले असून या निर्देशकांचे निम्न, मध्यम व उच्च यामध्ये सरासरी व प्रमाप विचलन यांच्याव्दारे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. सरासरी (+) प्रमाण विचलन यापेक्षा जास्त असणाऱ्या वारंवारिता उच्च संबोधण्यात आले आहे. तर सरासरी (.) प्रमाण विचलन यापेक्षा कमी असणाऱ्या वारंवारिता निम्न दर्शविण्यात आलेले आहे.

### योजना निहाय वैयक्तिक, व्यावसायिक व आर्थिक वारंवारितेचे वर्गीकरण

#### वैयक्तिक :

सारणी क. 1

| अ. क्र. | महामंडळाच्या योजना | निम्न | मध्यम | उच्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | २५ (१४.२०%) | १२१(६८.७५%) | ३० (१७.०५%) | १७६ |
| २ | मुदती कर्ज योजना | १८ (१४.१७%) | ८७ (६८.५०%) | २२ (१७.३३%) | १२७ |
| ३ | मार्जिन मनी योजना | ०३ (११.११%) | २० (७४.०७%) | ०४ (१४.८२%) | २७ |
| ४ | स्वर्णिमा योजना | १० (१४.०८%) | ५५ (७७.४६%) | ०६ (०८.८६%) | ७१ |
| ५ | सूक्ष्म पतपुरवठा योजना | ०४ (११.७६%) | २६ (७६.४७%) | ०४ (११.७७%) | ३४ |
| ६ | स्वयं सक्षम कर्ज योजना | ०५ (१०.८६%) | ३२ (६९.५७%) | ०९ (१९.५७%) | ४६ |
| ७ | महिला समृध्दी योजना | ०२ (१०.५२%) | १५ (७८.९५%) | ०२ (१०.५३%) | १९ |
| | एकुण | ६७ | ३५६ | ७७ | ५०० |

#### व्यावसायिक :

सारणी क. 2

| अ. क्र. | महामंडळाच्या योजना | निम्न | मध्यम | उच्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | २६ (१४.७७%) | ११६(६५.९१%) | ३४ (१९.३२%) | १७६ |
| २ | मुदती कर्ज योजना | २२ (१७.३२%) | ८० (६२.९९%) | २५ (१९.६९%) | १२७ |
| ३ | मार्जिन मनी योजना | ०६(२२.२२%) | १६ (५९.२६%) | ०५ (१८.५२%) | २७ |
| ४ | स्वर्णिमा योजना | १० (१४.०८%) | ४७ (६६.२०%) | १४ (१९.७२%) | ७१ |
| ५ | सूक्ष्म पतपुरवठा योजना | ०९ (२६.४७%) | २१ (६१.७६%) | ०४ (११.७७%) | ३४ |
| ६ | स्वयं सक्षम कर्ज योजना | १२ (२६.०७%) | २८ (६०.८७%) | ०६ (१३.०४%) | ४६ |
| ७ | महिला समृध्दी योजना | ०१ (०५.२६%) | १४ (७३.६८%) | ०४ (२१.०६%) | १९ |
| | एकुण | ८६ | ३२२ | ९२ | ५०० |

#### आर्थिक :

सारणी क. 3

| अ. क्र. | महामंडळाच्या योजना | निम्न | मध्यम | उच्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | १९ (१०.८०%) | १२३(६९.८९%) | ३४ (१९.३१%) | १७६ |
| २ | मुदती कर्ज योजना | १५ (११.८१%) | ९२ (७२.४४%) | २० (१५.७५%) | १२७ |
| ३ | मार्जिन मनी योजना | ०५ (१८.५२%) | १८ (६६.६७%) | ०४ (१४.८१%) | २७ |
| ४ | स्वर्णिमा योजना | ०८ (११.२७%) | ५० (७०.४२%) | १३ (१८.३१%) | ७१ |
| ५ | सूक्ष्म पतपुरवठा योजना | ०५ (१४.७१%) | २४ (७०.५९%) | ०५ (१४.७०%) | ३४ |
| ६ | स्वयं सक्षम कर्ज योजना | ११ (२३.९१%) | २७ (५८.७०%) | ०८ (१७.३९%) | ४६ |
| ७ | महिला समृध्दी योजना | ०५ (२६.३२%) | ११ (५७.८९%) | ०३ (१५.७९%) | १९ |
| | एकुण | ६८ | ३४५ | ८७ | ५०० |

सारणी क्र. १,२ व ३ च्या अवलोकना वरुन असे निदर्शनास येते की, योजना निहाय वर्गीकरणा अंतर्गत लाभार्थ्यांच्या वैकक्तिक, यावसायिक व आर्थिक निर्देशक हे प्रसामान्य संभाव्यता वकz (Normal Distribution Curve) यामध्ये विखूरल्याचे दिसून येते.

### वैयक्तिक व व्यावसायिक चलामधील सहसंबंध गुणक दर्शविणारी सारणी

सारणी क. 4

| अ.क्र. | महामंडळाच्या योजना | सहसंबंध गुणक |
|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | ०.३५०५** |
| २ | मुदती कर्ज योजना | ०.३५०६** |
| ३ | मार्जिन मनी योजना | ०.४३७५* |
| ४ | स्वर्णिमा योजना | ०.२७७३** |
| ५ | सूक्ष्म पतपुरवठा योजना | ०.२६६८ |
| ६ | स्वयं सक्षम कर्ज योजना | ०.१९९० |
| ७ | महिला समृध्दी योजना | ०.१९२० |

'५: शाश्वत पातळीवर महत्वपूर्ण ''१: शाश्वत पातळीवर महत्वपूर्ण

सारणी क्र. ४ मध्ये बीज भांडवल, मार्जिन मनी व स्वर्णिमा योजनेच्या गुणकामध्ये सहसंबंध आहे असे आढळते. मात्र उर्वरीत सूक्ष्म पतपुरवठा, स्वयं सक्षम व महिला समृध्दी योजनेमध्ये सहसंबंध दिसून येत नाही. अध्ययनासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांच्या प्रतिसादावरुन विभाजित केलेल्या वैयक्तिक व व्यावसायिक माहितीच्या आधारे सहसंबंध दर्शविला आहे. 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या' बीज भांडवल योजना, मुदती कर्ज योजना, स्वर्णिमा योजना या त्यांच्या वैयक्तिक व व्यावसायिक चलामधील सहसंबंध गुणकामध्ये १ः शाश्वत पातळीवर महत्वपूर्ण आढळल्या तर मार्जिन मनी योजनाही ५ः शाश्वत पातळीवर महत्वपूर्ण आढळली याचे कारण म्हणजे स्त्री लाभार्थ्यांपेक्षा पुरुष लाभार्थ्यांचे या योजनेमध्ये वर्चस्व, २०-४० या वयोगटातील महाविद्यालयीन लाभार्थी संख्या, व्यवसायात कमीत-कमी कर्ज घेऊन ५०ः पर्यंत त्यातून स्थिर संपत्ती खरेदी करुन मिळालेल्या उत्पन्नातून महामंडळाविषयी समाधान व्यक्त करणे हे आहे.

'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या' सूक्ष्म पतपुरवठा योजना, स्वयं सक्षम कर्ज योजना, महिला समृध्दी योजने मध्ये सहसंबंध गुणक आढळत नाही. याचे कारण म्हणजे लाभार्थ्यांची संख्या व त्यांची शैक्षणिक पातळी यात विभिन्नता आहे. तसेच कुटुंबातील व्यक्तींची संख्या व त्यांचे वार्षिक उत्पन्न अधिक आहे. लाभार्थी व्यावसायिक प्रशिक्षीत नाही. त्यामुळे परंपरागत व्यवसाय करुन कमीत-कमी उत्पन्न कमवितात. तसेच महामंडळाकडून कमीत-कमी कर्ज घेऊन जास्तीत-जास्त व्याज त्यावर देतात. कर्जाची परतफेड सुध्दा इतर योजनेच्या लाभार्थ्यांपेक्षा लवकर करतात. त्यामुळे त्यांना पाहिजे तेवढा लाभ महामंडळाच्या कर्जापासून न मिळाल्याने या योजनेचे लाभार्थी समाधान व्यक्त करित नाही.

### *निष्कर्ष :*

१.महामंडळाची बीज भांडवल योजना, मुदती कर्ज योजना, मार्जिन मनी योजना स्वयंरोजगार करण्यासाठी किंवा उद्योग स्थापन करण्यासाठी तर स्वर्णिमा योजना महिलांना सक्षम करण्यासाठी तसेच सूक्ष्म पतपुरवठा योजना पुरुषांच्या बचत गटांना, स्वयं सक्षम कर्ज योजना ही व्यावसायिक शिक्षक पूर्ण झालेल्या तरुण-तरुणींना व्यवसाय करण्यासाठी, महिला समृध्दी योजना महिलांच्या बचत गटांना कर्ज पुरवठा करीत असते.
२.महामंडळाच्या बीज भांडवल योजना व मुदती कर्ज योजनेची लाभार्थी संख्या इतर योजनेच्या प्रमाणात खूप जास्त असल्याचे त्यांच्या आर्थिक अध्ययनावरुन लक्षात येते.
३.महामंडळाच्या एकूण ०७ योजनेपैकी फक्त बीज भांडवल कर्ज योजना राज्य शासनाची असून उरलेल्या योजना हया राष्ट्रीय महामंडळाच्या आहेत. त्यांची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून राज्य महामंडळ कार्य करीत असते.
४.सहसंबंध गुणकावरुन महामंडळाचे काही लाभार्थी समाधानी आहेत तर काही लाभार्थी समाधानी नाहीत हे लक्षात येते.

### *संदर्भग्रंथ :*

१.Kaushik S.K. &V. Rengrajan (2010), 'Microfinance and women Empowerment', serial publication; Delhi.
२.Mohanty Manoranjan (2004), 'Vol.-5, 6 Class, Cast, Gender: Readings in Indian Government and Politics', Sage Publications; New Delhi.
३.Puniya Ajitkumar (2005), 'National Backward Classes Finance and Development Corporation', Project Report Submitted in Karnataka Govt.
४.Yadav Namita (2002), 'Other Backward Classes: Then and Now', Sage Publications; New Delhi.
५.आगलावे डॉ. प्रदिप (२००६), 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशनय नागपुर.
६.आंबर्डेकर एन.एस. आणि पाटील जे.एफ. (१९७९), 'भारतीय कामगार समस्या व कामगार विधान', कॉन्टीनेंटल प्रकाशनय पुणे.
७.बोरचाटे सुनिल शिवदास (२०११), 'महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ जिल्हा कार्यालय वाशिम यांचे चिकित्सक अध्ययन' (कालावधी २००३-०४ ते २००८-०९), पि.एचडी. प्रबंध, नागपूर विद्यापीठय नागपूर.
८.कालेलकर डॉ. एन.जी. (१९७५), 'कालेलकरर्स मराठी इंग्रजी डिक्शनरी', शुभदा सरस्वतीय पुणे.
९.काचोले डॉ. दा.धो. (१९९३), 'सामाजिक संशोधन पध्दती', कैलाश पब्लिकेशनय औरंगाबाद.
१०.कांबडे डॉ. उत्तम (२००९), 'पिंछडो का सामाजिक राजनितिक आंदोलन', सिध्दार्थ बुक्सय नई दिल्ली.
११.नेहरु जवाहरलाल (१९८६), 'संक्षिप्त विश्व इतिहास की झलक', सस्तासाहित्य मंडल प्रकाशनय दिल्ली.
१२.माहितीपुस्तिका : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ.
१३.वेबसाईट :
१.http://www.nbcfdc.org.in
२.http://www.msobcfdc.com



*प्रा. अनिल महादेवराव तिरकर*
*सहाय्यक प्राध्यापक , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महा. अकोला.*



*प्रा. डॉ. अरुंधती एस. निनावे*
*सहयोगी प्राध्यापक , श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महा. अकोला.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com